RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

**वर्ष १०, अंक २९]** **गुरुवार, फेब्रुवारी २९, २०२४/फाल्गुन १०, शके १९४५** **[पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक ५०**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ फेब्रुवारी,२०२४.

**अधिसूचना**

**नोंदणी अधिनियम, १९०८.**

क्रमांक आस्थाप-२०२३/७३४/प्र.क्र.१६०/म-१.—नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ५ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, गडचिरोली जिल्ह्याच्या उप-जिल्हा आरमोरी व कुरखेडा यांच्या सीमांमध्ये २९ फेब्रुवारी, २०२४ पासून फेरबदल करीत आहे ; आणि त्या प्रयोजनार्थ, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आस्थाप-२००५/१६९०/प्र. क्र. ३४२/म- १, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) यामध्ये, पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेस जोडलेल्या दुसऱ्या अनुसूचीमधील, जिल्हा गडचिरोली याच्याशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ७ येथील नोंदीमध्ये,—

(क) स्तंभ (४) मधील उप-जिल्हा आरमोरी याच्याशी संबंधित असणाऱ्या उप-नोंदी समोरील, "आणि कोरची महसुली तालुका" हा मजकूर, वगळण्यात येईल;

(ख) स्तंभ (४) मधील उप-जिल्हा कुरखेडा याच्याशी संबंधित असणाऱ्या उप-नोंदी समोरील, "आणि कुरखेडा महसुली तालुका" या मजकुरानंतर, "आणि कोरची महसुली तालुका" हा मजकूर, जादा दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण एस. बजाज,**
शासनाचे उप सचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 29th February, 2024.

*NOTIFICATION*

REGISTRATION ACT, 1908.

No.Est-2023/734/C.R.160/M-1.—In exercise of the powers conferred by section 5 of the Registration Act, 1908 (16 of 1908). in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra hereby, with effect from the 29th February, 2024, alters the limits of Sub-District Armori and Kurkheda of District Gadchiroli; and for that purpose, amends the Government Notification, Revenue and Forests Department. No.EST.2005/1690/CR-342/M-1, dated the 31st October 2005 (hereinafter referred to as "the said notification"), as follows, namely:-

In the Second Schedule appended to the said notification. in entry at serial number 7 relating to District Gadchiroli.—

(*a*) against sub-entry relating to Sub-District Armori in column (4), the words "and Revenue Taluka of Korchi" shall be deleted;

(*b*) against sub-entry relating to Sub-District Kurkheda in column (4), after the words "Revenue Taluka of Kurkheda" the words and "Revenue Taluka of Korchi" shall be added.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN S. BAJAJ ,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.